|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४/विवि /सा.फु.प्र.शि. वि.स./12/२०२६ दि. २०/०१/२०२६

**प्रति,**

१) मा.प्राचार्य/ संचालक विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था

२) मा.संचालक, विभाग प्रमुख विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग

**विषय :- सावित्रीबाई फुले प्रथम शिक्षित विद्यार्थीनी सन्मान योजनेबाबत...**

महोदय/ महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ हे आदिवासी, शेतकरी, कष्टकरी समाज व्यवस्थेतून येणा-या विद्यार्थ्यांचे विद्यापीठ म्हणून ओळखले जाते. सातपुड्याच्या दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बंधू-भागीनींपर्यंत शिक्षणाची गंगा नेण्याचे कार्य विद्यापीठ अनेक वर्षापासून करीत आहे. याचाच एक भाग म्हणून विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालय व प्रशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या परन्तु आपल्या कुटुंबात प्रथम शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींसाठी विद्यापीठाने सावित्रीबाई फुले प्रथम शिक्षित विद्यार्थिनी पुरस्कार सुरु केला आहे.

सदर पुरस्काराच्या माध्यमातून कुटुंबातून प्रथम शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीचा उत्साह वाढविणे व तिला आर्थिक मदत करणे हे प्रमुख उद्दिष्ट्य असून विद्यापीठ संलग्नक्षेत्रात महाविद्यालयीन नियमित शिक्षण घेणा-या विद्यार्थीनींसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सावित्रीबाई फुले प्रथम शिक्षित विद्यार्थीनी सन्मान राबविण्यात येत आहे.

एका विद्यार्थीनीस एकाच वेळेस सदर सन्मान मिळेल. विद्याशाखेनुसार व इ. १२ वी च्या गुणानुसार गुणक्रम ठरविले जातील. **सदर योजना प्रामुख्याने प्रथमवर्ष पदवीस्तरावर शिक्षण घेणा-या विद्यार्थीनींसाठी आहे.**

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये आपल्या महाविद्यालयात नियमित शिक्षण घेणा-या विद्यार्थीनींसाठी सावित्रीबाई फुले प्रथम शिक्षित विद्यार्थीनी सन्मान योजना असून सदर योजनेत लाभ घेण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थीनींचा प्रस्ताव सोबत जोडलेल्या नमुन्यातील माहिती आपल्या मुखपृष्ठावर (लेटरहेड) टंकलिखीत करुन **दि. ३१ जानेवारी, २०२६** पर्यत किंवा तत्पुर्वी विद्यार्थी विकास कार्यालयात जमा कराव्यात, ही विनंती.

आपला विश्वासू,

20-1-2026

(डॉ. जयेंद्र दि. लेकुरवाळे)
**संचालक, विद्यार्थी विकास**

**<u>सोबत</u> :- विहित नमुना, योजनेचे नियम**

**<u>प्रत</u> :-**

१) मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव

२) मा. कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

३) मा. प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

४) जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव - कृपया परिपत्रक वृत्तपत्र व उत्तम विद्या अंक यामध्ये प्रसिध्दी द्यावी.

५) पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव-कृपया परिपत्रकास संकेतस्थळावर प्रसिध्दी द्यावी.

D/Rp2025-26/savitribai pratham shikshit vidyarthini Sanman yojna

## नियमावली :-

१) पुरस्कारासाठी अर्ज करणारी विद्यार्थिनी ही विद्यापीठ प्रशाळा किंवा महाविद्यालयात शैक्षणिक वर्षात नियमित प्रवेशीत विद्यार्थिनी असणे आवश्यक आहे.

२) अशिक्षित आई-वडील असलेल्या कुटूंबातून शिक्षण घेणारी ती प्रथम मुलगी असावी मोठा भाऊ किंवा लहान बहिण/भाऊ शिक्षित किंवा शिकत असल्यासही सदर विद्यार्थिनी हि प्रथम शिक्षित विद्यार्थिनी म्हणून गणली जाईल.

३) सदर विद्यार्थिनीच्या अगोदर तिची वडील बहिण जर शिक्षित असेल तर सदर विद्यार्थिनी पुरस्कारास पात्र ठरणार नाही.

४) सदर पुरस्कारासाठी अर्ज करतांना महाविद्यालयाने अर्जासोबत विद्यार्थिनीचे प्राचार्याच्या सहीचे व महाविद्यालयाच्या शिक्क्याचे बोनाफाईड प्रमाणपत्र, सदर विद्यार्थिनी हि तिच्या कुटुंबातील प्रथम शिक्षित विद्यार्थिनी असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्यार्थी विकास अधिकारी यांच्या सहीचे हमी पत्र, सोबतच पालकांचे हमी पत्र व विद्यार्थिनीचे इ. १२ वी परीक्षेचे गुणपत्रक असणे आवश्यक आहे.

५) एका विद्यार्थिनीस एकाच वेळेस सदर सन्मान मिळेल.

६) शाखेनुसार इ. १२ वी च्या गुणांच्या आधारे गुणानुक्रम ठरविले जातील.

७) प्रती महाविद्यालय कमाल तीन विद्यार्थिनींचे प्रस्ताव पाठविता येतील.

८) पुरस्काराची रक्कम विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार जाहीर करण्यात येईल.

९) पुरस्कार वाटपाबाबत वेळोवेळी विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार कार्यक्रमाचे स्थळ व वेळ निश्चित करुन संबंधित महाविद्यालयास कळविण्यात येईल.

१०)सदर योजनेचे प्रस्ताव मागविण्याबाबत दरवर्षी विद्यार्थी विकास विभागाकडून परिपत्रक निर्गमीत करण्यात येईल.

**सावित्रीबाई फुले प्रथम शिक्षित विद्यार्थींनी सन्मान योजना**
**विहीत अर्ज - (वर्ष २०२५-२६)**

अलिकडील
फोटो

## विभाग - अ : शैक्षणिक माहिती :-

१. विद्यार्थीनीचे नाव :- ..........................................................

२. महाविद्यालय/ परिसंस्था :- ..........................................................
विद्यापीठ प्रशाळा /विभागाचे नाव

३. विद्यार्थीनी चा प्रवेशित वर्ग/अभ्यासक्रम :- ..........................................................

४. मागील वर्षी वार्षिक परीक्षेत मिळालेले गुण व टक्के:- ..........................................................
(SGPA/CGPA/Grade)

५. विद्यार्थीनीचा पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :- ..........................................................
(पिन कोड क्र.सह) :- ..........................................................

६. भ्रमणध्वनी क्रमांक :- ..........................................................

७. E-mail :- ..........................................................

८. जन्म दिनांक :-

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

दिनांक महिना वर्ष

९. बॅकेचे नाव :- ..........................................................

खाते क्रमांक :- आय.एफ.एस.सी. क्रमांक :- बॅक लिंक मो.क्र.:-

## विभाग-ब : कौटुबिक माहिती :

१. वडीलांचे संपुर्ण नाव व पत्ता :- ..........................................................
..........................................................
..........................................................

२. कुटुंबातील सदस्यांची माहिती :-

| अ.क्र. | सदस्याचे नाव | नाते | शिक्षण | वय/ वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

मी नमूद करते की, वर दिलेली सर्व माहिती योग्य असून, पुष्टीकरिता आवश्यक दस्तऐवजांचा छायांकित प्रति अर्जासोबत जोडत आहे. सदर माहिती / दस्तऐवजामध्ये चुक आढळल्यास मला मिळालेले अर्थसहाय्य विद्यापीठास सत्वर परत करेल अशी हमी देते. याबाबत विद्यापीठामार्फत कोणताही निर्णय झाल्यास तो माझ्यावर बंधनकारक राहील याची मला जाणीव आहे.

........................... ...........................

(पालकाची स्वाक्षरी) (विद्यार्थी/ विद्यार्थिनीची स्वाक्षरी)

दिनांक : / /२०२६

.......................................................................................................................................

प्रमाणित करण्यात येते की , ........................................................................ ही शैक्षणिक वर्ष- २०२५-२६ करीता ........................वर्गामध्ये ............... ...... ......... विषयासाठी नियमित विद्यार्थीनी म्हणुन आमच्या महाविद्यालय/ परिसंस्था/ विद्यापीठ प्रशाळा- विभागात प्रवेशीत आहे. विद्यार्थीनीने दिलेली माहितीची पडताळणी महाविद्यालयस्तरावर करण्यात आलेली असून सदर विद्यार्थीनी या योजनेस पात्र आहे अशी शिफारस करीत आहोत.

विद्यार्थी विकास अधिकारी<br>यांची स्वाक्षरी

मा.प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख/नियंत्रक अधिकारी<br>यांची स्वाक्षरी सही व शिक्का

दिनांक :- / / २०२६

****************